# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक ६ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ डिसेंबर २०११ पाने १६ किंमत २० रूपये


## पुन्हा एकदा अण्णांचा एल्गार !

## भडकला जनभावनेचा अंगार !

## नव्या लढाईचा बिगूल !

## जनता
विरूद्ध
## सरकार



## शाळेतली खिचडी ,भ्रष्टाचाराची फोडणी

**माहिती अधिकार वापरा,**
**मध्यान्ह भोजन योजनेची तपासणी करा**

**रेडिमेड प्रश्नावली**



सरकारी विभागांना काय व कोणती माहिती मागावी ?

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार


सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी
संजय मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)


अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

नागरिक अधिकार या मासिकासाठी स्वराज बहुउद्देशीय संस्था,खारघर नवी मुंबई यांच्याकडून छपाई व वितरणासाठी अर्थसाहय उपलब्ध झाले आहे.



## संपादकीय...........



## "सारे जहाँ से गंदा पॉलिटिकल हमारा"

देश स्वातंत्र्य झाला त्याला ६५ वर्षे झाली.गेल्या ६५ वर्षात देशात अभिमानास्पद वाटाव्यात अशा ६५ घटना सांगताना डोक्याला ताण द्यावा लागेल.सगळा देश अभिमानाच्या लहरीने उसळून निघाला.आणि देशातील शेतकरी,कामकरी, खेडूत, शहरी, महिला, मुले सगळे देशप्रेमाने भारून देशाला पुढे नेण्याची भाषा करीत आहेत.असे चित्र फार कमी वेळा पाहायला मिळाले.राजेंद्र प्रसाद यांच्यानंतर केवळ अब्दूल कलाम राष्ट्रपती झाले तेव्हा देशाला भरभरून अभिमान वाटला होता. इतके सारे राष्ट्रपती झाले परंतु देशाला स्वप्न पाहायला शिकविणारे महामहिम कलाम साहेब सोडले तर बाकी सगळे रबरी शिक्के च निघाले ! इंदिराजींच्या नेतृत्वाखाली पाकीस्तान हरवून बाग्लादेशाची लढाई जिंकली तेव्हाही देशाला अभिमान वाटला होता. देशात जेव्हा १९७२ साली अणू चाचणी यशस्वी झाली तेव्हा पहिल्यांदा खरोखरच "बुद्ध हसला" होता.राकेश शर्मा अंतराळात गेला तेव्हा आम्हाला आमचा देश "सारे जहाँ से अच्छा" वाटला होता. आयोध्या वादावर गेल्या वर्षी जेव्हा कोर्टाचा समापोचाराचा तोडगा आला तेव्हा सर्व देशाने शांततेने हा न्यायालयाचा निर्णय स्विकारला तेव्हा हा देश समजदार आणि संयमी आहे हे दिसले होते. असे काही फार कमी प्रसंग वगळता या देशाला लबाड आणि बदमाशांनी देशाला नेहमीच ओलीस ठेवले आहे असे हजारो प्रसंग आपल्याला दिसून आले आहेत.

देशात घडलेले बोफोर्स कांड सगळयाचे डोळयादेखत जिरविले गेले.हर्षद मेहता बरोबरच त्याच्या घोटाळाही समाधीस्त झाला.तेलगी कांडात तेलगी जेलमध्ये गेला परंतु ज्यांनी तेलगी चे तेल ओरपले ते सगळे राजकीय पैलवान मोकळे च राहिले.गेल्या दोन वर्षात तर आदर्श घोटाळा, कॉमनवेल्थ घोटाळा, स्पेक्टम घोटाळा असे काही लाख करोड रूपयांचे घोटाळे उघड झाले आणि हताश माणूस उसळून उठला.

या सर्व घोटाळयानंतर जनलोकपाल चे आंदोलन देशातील जनतेने उभे केले आहे. या आंदोलनाला अण्णा हजारे यांचा सारखा नैतिक अधिष्ठान असणारा नेता मिळाला आहे.संसद श्रेष्ठ आहेच परंतु संसदेपेक्षाही जनता सार्वभौम आहे.हे अधिक खरे आहे.अशा वेळी संसद काय ते पाहिल जनतेने बोलूच नये असे म्हणणे खराब राजकारणाचे लक्षण आहे.जनता विरूध्द सरकार किंवा जनता विरोधात जनप्रतिनिधी अशी दुफळी न करता व कसलेही राजकारण न करता जनता श्रेष्ठ आहे हे तत्व स्विकारून जनतेच्या मनातील जनलोकपाल कायदा यायला हवा होता.परंतु असे झाले नाही.आता जनतेने आंदोलन व निवडणूकीच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवालाच हवी.

शिंतोडे उडाल्यानंतर चारित्र्य सुधारण्यापेक्षा ते आधीपासूनच जपणे ही सर्वांत सोपी गोष्ट आहे.

# शाळेतली खिचडी ,भ्रष्टाचाराची फोडणी

## माहिती अधिकार वापरा,

## मध्यान्ह भोजन योजनेची तपासणी करा

शाळेत मध्यान्ह भोजन पुरविण्यास सुरूवात झाली तेव्हा सुधारणावाद्यांनी व विचार वंतानी या योजनेचे स्वागत केले होते.या योजनेमुळे मुलांची उपस्थिती नियमित राहिल.गरीब मुलांना किमान पोषक आहार मिळेल.असे वाटत होते.गेल्या दहा वर्षापासून ही योजना सर्व राज्यात जोरात राबविली जात आहे.२००६ पासून प्रत्येक शाळेमध्ये भटारखाना सुरू झाला.शिक्षणा बरोबरच शाळेत खिचडीचा वास घमघम करू लागला.मुलांच्या पोटात खिचडीचे दोन घास जावू लागले त्याच वेळी गुरूजीच्या खिशातही पगाराव्यक्तीरिक्त तांदुळ,तेल व मसालातील शिल्लक राहिलेले चार पैसे खुळखळू लागले.प्रसंगी खिचडीत तेल आणि मसाला कमी झाला परंतु गुरूजीचा खिसा मात्र भरत च राहिला.

आता तर शाळा-शाळा मधून खिचडी नावालाच राहिली आहे.ही योजनाच शासनातले अधिकारी, तांदुळ वितरीत करणारे ठेकेदार आणि प्रत्येक शाळामधील मुख्याध्यापक यांनी हायजॅक केली असून या खिचडीचा मलिदा वरील सर्व घटकांच्या खिशात मोठया प्रमाणात जावू लागला आहे.

इ.१ ते ५ थी मुलांना रोज सरासरी १०० ग्रॅम आणि इ.६ ते ८ वी च्य प्रत्येक मुलांना रोज १५० ग्रॅम वजनांची खिचडी असा हिशोब आहे.प्रत्यक्षा शालेय मुले एकाच वेळी इतकी खिचडी खावू शकत नाही. अगदी यांच्या निम्यानेही खात नाहीत.तसेच शाळेत उपस्थित असणारी सगळीच मुले खिचडी खात नाहीत.सरासरी उपस्थित मुलांपैकी सुमारे दहा टक्के मुले घरचा डब्बा खातात.त्यामुळे त्यांच्या नावचा तांदुळ शिल्लक राहतो.परंतु शाळा मात्र रोज सगळी सगळी मुले ठरवून दिलेली सगळी खिचडी खातात.असा अहवाल दाखवितात.शाळेत काही कारणामुळे विद्यार्थी गैरहजर असतो.हजेरी पटावर तो शाळेत नाही असे दिसत असतानाही खिचडी खाणाऱ्यांच्या यादीत मात्र गैरहजर विद्यार्थ्यांचेही नाव असते.हा अजब प्रकार पाहून शाळेतल्या खिचडीला रोजच्या रोज भ्रष्टाचाराची किती मोठी फोडणी रोज बसत आहे हे दिसून येत आहे.

एका शाळेत सुमारे पाचशे विद्यार्थी असतील तर प्रतिविद्यार्थी १५० ग्रॅम या प्रमाणे रोज ७५ किलो तांदूळ लागतो.परंतु प्रत्याक्षात चारशेच मुलेच जर प्रती विद्यार्थी १०० ग्रम या प्रमाणे खिचडी खात असतील तर प्रत्यक्षात केवळ ४० किलो तांदुळ पुरेसा होता.म्हणजे रोज ३५ किलो तांदूळ शिल्लक राहायला हवा मात्र बहुतांश शाळामधून खिचडीचा जो अहवाल जातो त्यात रोज सगळे विद्यार्थी ठरवून दिलेल्या वजनाप्रमाणे रोज सगळी खिचडी खातात असे दाखवून मोठया प्रमाणात तांदूळ तसे खिचडी बनविण्याचा खर्च म्हणून मिळणारे अनुदान यात मोठा भ्रष्टाचार होतो.

राज्यातील सगळया शाळांतील मध्यान्ह भोजन योजनेत पात्र विद्यार्थी , रोजचे हजर विद्यार्थी , हजर विद्यार्थ्यांपैकी रोज खिचडी खाणारे विद्यार्थी, प्रत्यक्ष प्रतिविद्यार्थी ठरवून दिलेला तांदूळ तसेच प्रत्यक्ष वापरलेला तांदुळ,ठरवून दिलेले अनुदान व प्रत्यक्ष वापरलेले अनुदान अशा काही मुद्यावर सर्व शाळांचे लेखापरिक्षण झाले तर या राज्यात आदर्श घोटाळयापेक्षा कितीतरी मोठा असा खिचडी घोटाळा बाहेर येईल.

हातावरील रेषेत दडलेले भविष्य बघू नका, त्याच हाताने कष्ट करा व स्व:तचे भविष्य घडवा.

## माहिती अधिकार कार्यकर्त्यांनो या नमूना अर्जाचा आधार घ्या आणि आपल्या प्राथमिक शाळेतील खिचडीतील भ्रष्टाचाराची माहिती काढून आपल्या परिसरातील वर्तमानपत्रात प्रसिद्ध करा

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी

द्वारा मुख्याध्यापक

----------------------- शासनमान्य प्राथमिक शाळा

१) अर्जदाराचे नांव - ----------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :---------------------------------------------------------

३) माहितीचा विषय व कालावधी- आपल्या --------------------------------------- या शासनमान्य प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मोफत मध्यान्ह भोजन योजनेचा गेल्या सहा महिन्यातील (जून २०१२ ते डिसेंबर २०१२)दरम्यानचा तपशील मिळणेबाबत.

अ ) आपल्या शाळेत प्राथमिक विभागात इयत्ता पहिली ते चौथी तसेच इयत्ता पाचवी ते आठवी या इयत्ता एकूण विद्याथी संख्या किती आहे.

ब) आपल्या शाळेतील प्राथमिक विभागातील सर्व वर्गातील सर्व वर्गाची जून ते डिसेंबर या काळातील हजेरी पत्रकांच्या सत्यप्रती मिळाव्यात

क) आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनामध्यान्ह भोजन योजनेसंबंधी काही निश्चित नियम किंवा मार्गदर्शक तत्वे आहेत काय ?असल्यास त्यासंदर्भात आपल्या खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याचे उपलब्ध लेखी पत्र,आदेश आदी लेखी तपशील द्यावा.मध्यान्ह भोजन योजनेत विद्यार्थ्यांना रोज कोणते, काय व किती वजनांचा आहार पुरविणे आवश्यक व बंधनकारक आहे.आपल्या शाळेने काय आहार व किती वजनांचा व किती पुरविला.

ड) गेल्या सहा महिन्यात आपल्या शाळेत विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्यात शासनाकडून किती अन्नधान्य तांदुळ / दाळ अन्य सामान प्राप्त झाले?पुरककिराणा खरेदीसाठी किती रूपये मंजूर झाले?प्रत्येक महिन्यचा तपशील द्यावा.

इ) खिचडी किंवा आहार शिजवून विद्यार्थ्यांना वाढण्यासाठी प्रति विद्यार्थी रोज किती रूपये मंजूर केले जातात ? आहार शिजवून वितरीत करण्याचे काम कोणाला दिले आहे त्यांचा नाव व पत्ता द्यावा. त्यांना आत्ता पर्यंत गेल्या सहा महिन्यात दिलेल्या बीलाच्या छायांकित प्रती द्याव्यात.

फ) आपण गेल्या सहा महिन्यात मध्यान्ह भोजन योजनेत खिचडी किंवा अन्य आहार विद्यार्थ्यांना पुरविल्याचा जून ते डिसेंबर २०१२ मधील साप्ताहिक /मासिक/ किंवा जो उपलब्ध आहे त्या अहवालाच्या छायांकित प्रती द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश :स्पीड पोष्टाने / व्यक्तीश:

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही ( नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : ----------------

दिनांक : - - 2012

( नाव -------------------)

**Mo: 0000000000**

जीवनातला अंधकार नाहीसा करणारी ज्योत म्हणजे हास्य !

रोखठोक मत

# सावधान !

## इथे लोकशाहीचा खून करण्याचा कट शिजतोय ....

भारतीय मध्यवर्ती सरकारने जनतेने बनविलेला जनलोकपालचा कायदा हानुन पाडून निव्वळ सरकार छाप जोकपालचा कायदा करण्याचा प्रयत्न केला आहे.सरकारी जोकपाल संसदेत आणून सांसदीय लोकशाहीच्या नावाखाली शासनाने व राज्यकर्त्यांनी सार्वभौम जनतेचा मानभंग व तजोभंग केला आहे.

देशातील करोडो-करोडो जनतेने संविधानाने दिलेल्या अधिकाराचा उपयोग करून जन आंदोलनाद्वारे सत्ताधाऱ्यांनी सशक्त लोकपाल कायदा करावा असा जनादेशच दिला होता.परंतु जनतेच्या मतापेक्षा जनप्रतिनिधीचा दुराग्रह वरचढ ठरला आणि जनलोकपालच्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी चिंध्या-चिंध्या केल्या.खरे तर करोडो जनता इच्छीत असलेला जनलोकपाल मंजूरकेला असता तर भारतीय लोकशाहीने एक वैभवशाही परंपरा घालून दिली असा संकेत जगभर गेला असता.परंतु हाय आम्हा भारतीयांचे हे दुर्दैव की आम्हाला आमचा आवाज न ऐकणारे व बहिऱ्यांचे सोंग घेतलेले जनप्रतिनिधी मिळाले आहेत.

खरे तर प्रतिनिधी या शब्दातच निवडून गेलेल्या जन प्रतिनिधींच्या मर्यादा स्पष्ट होत आहेत.प्रतिनिधीच्या स्वत:च्या मताला फार महत्व नसतेच तर तो ज्यांचा प्रतिनिधी आहे.त्या मुळ जनतेचे जे मत आहे तेच मत मांडण्यासाठी प्रतिनिधींना संसदेत पाठविलेले असते.परंतु आम्ही आमचे तेच म्हणणे खरे करू.जनतेचे आम्ही ऐकणार नाही.असा दुराग्रह करून बहुतांश राजकारण्यांनी व सत्ताधाऱ्यांनी लोकभावनेचा मानभंग केला आहे.जनतेचा आवाज न ऐकता जनप्रतिनिधी जेव्हा स्वत:चा आवाज मोठा करतात तेव्हा प्रतिनिधीशाहीकडून लोकशाहीचा मुडदा पाडण्याचा प्रयत्न होत असतो.जनलोकपाल विरोधात लोकप्रतिनिधी या लढाईत लोकांचा तजोभंग झाला.लोकपालच्या जागी जोकपाल आणून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न झाला आहे.प्रतिनिधी वरचढ ठरले

**मंदिरातील देव गायब करून पुजाऱ्यांनी स्वत:ला ईश्वर म्हणून जाहीर करावे.आणि समस्त भक्तांनी आमचीच पूजा करावी असे चलाख शहाणपण भक्तांना शिकवावे अगदी असाच प्रकार जनलोकपालच्या निमित्ताने भारतीय संसदेच्या मंदिरात घडला आहे. या पाखंडी पुजाऱ्यांच्या निवडणूकीत सच्चे भक्त मुसक्या बांधल्याशिवाय राहणार नाहीत.**

भारतीय संसद हे लोकशाही देवीचे मंदीर आहे.या मंदिरात जनआंकांक्षेची देवी प्रतिष्ठापित केली गेली आहे.या जनांकांक्षेच्या देवीची पूजा करणारे खासदार नामक पूजारीच जर लोकशाहीच्या देवीला गायब करून स्वत:लाच ईश्वर म्हणून घोषीत करीत करू लागले असून व आम्ही म्हणू तेच खरे जनतेच्या आवाजाला आम्ही किंमत देणार नाही असे म्हणत असतील तर हे ढोंगी पुजारी निवडणूकीच्या मार्गाने मंदिरातून हकलून लावलेच पाहिजेत.

दिल्ली निवडून जाणारे जर गल्ली-गल्लीच्या भावनांचा व विकासांचा विचार न करता देशाला लूटून खाणार असतील तर संसदीय लोकशाहीला खरा धोका या लूटारू जनप्रतिनिधी पासूनच आहे.म्हणूनच जनता भ्रष्टाचार रोखण्यासाठी वर्षभरापासून रस्त्यावर आक्रोश व्यक्त करीत आहे.परंतु हा आक्रोश न ऐकता दिल्लीत जमा होणारे शे-पाचशे अहंकारी प्रतिनिधी जर १२० कोटी जनतेच्या लोकभावनांचा चूराडा करणार असतील तर दिल्लीच्या संसदेला असणारे अधिकार कमी करून पाच लाख खेडयातील प्रत्येक ग्रामसंसदेला अधिक अधिकार देणारी गांधी बाबांच्या स्वप्नातली ग्रामस्वराज्यच्या प्रतिष्ठापना करणे हाच आता या पुढे पर्याय उरतो.

-सुभाष बसवेकर

ज्याच्याजवळ पैशाशिवाय दुसरे काहीच नाही तो सर्वात गरीब !

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------

पत्ता :------------------------------------------

------------------------------------------

मोबाईल : | | | | | | | | | | |   | | | | | | | | | | |

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक | | | | | | | | |

व्यवसाय :-------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-----------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन.

आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : -------------

सही

### कार्यालयीन उपयोगासाठी

सभासद कोड नंबर [ ] मासिक वर्गणी नंबर [ ]

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक [ / / २०१२ ] मुदत समाप्तीचा दिनांक [ / / २०१३ ]
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये [ ] मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा ------------------------------------------------------------

ज्याप्रमाणे दररोज शरीर कपडे स्वच्छ करतो ,त्याचप्रमाणे मन देखील दररोज स्वच्छ करा .

सक्सेस स्टोरीज

# माहिती अधिकारात मिळाली एमपीएससीची उत्तरपत्रिका

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धात्मक परीक्षांत उमेदवाराने सोडविलेल्या उत्तरपत्रिका मागणीची सोय नव्हती. परिणामी प्राप्त गुणांविषयी उमेदवार साशंक असायचे.वशिलेबाजी होत असल्याचा आरोप नेहमीचाच झाला होता.मात्र,याला पुरावा नसल्याने आरोपात सत्यता असूनही अनेक उमेदवारांचे नुकसान व्हायचे.आता मात्र, यापुढे आरोप करण्याची आणि आयोगालाही त्यांच्या पारदर्शकतेची शिष्टाई मारण्याचे सुंधी मिळाली आहे.आयोगाने माहितीच्या अधिकारात मुळ उत्तरपत्रिकाच देण्याचे मान्य केले. एका नागपूरात तरूणाने आयोगाशी संघर्ष करून त्यांना तसा निर्णय घेण्यास बाध्य केले आहे आयोगाच्या कार्यपध्दतीविषयी पारदर्शकता स्पष्ट होण्यासाठी व उत्तरपत्रिकेचे मूल्यांकनाची खात्री व्हावी म्हणून नागपूरकर नीलेश भालचंद्र मदनकर यांनी केलेल्या संघर्षाला यश मिळाले.यामुळे लाखो उमेदवारांना उत्तरपत्रिका मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. ही बाब संपूर्ण राज्यातील उमेदवारांसाठी आनंदाची घटना आहे महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षेत एक उमेदवार म्हणून नीलेश मदनकर यांनी लेखी परिक्षा दिली.

त्या परीक्षेत त्यांनी प्राप्त केलेले प्रश्ननिहाय गुण, उत्तरपत्रिकेच्या साक्षांकित प्रत आणि या लेखी परिक्षेत प्रथम आलेल्या उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेची प्रत पुरविण्याची मागणी माहितीच्या अधिकारांतर्गत ९ ऑगस्ट २०११ च्या अर्जान्वये आयोगाकडे केली होती. यावर आयोगाचे कक्ष अधिकारी यांनी १५ सप्टेंबर २००६ च्या पत्रानुसार केंद्रीय माहिती आयोगाच्या ६ फब्रुवारी २००६ चे आदेशानुसार सद्य:स्थितीत उत्तरपत्रिकेच्या प्रती देता येत नसल्याचे कळविले.

या उत्तराने समाधान न झाल्याने या उत्तराविरूध्द त्यांनी आयोगाचे उपसचिव (परिक्षा) यांच्याकडे २६ संप्टेंबर २०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलावर १५ नोव्हेंबर २०११ रोजी आयोगाच्या मुंबई कार्यालयात सुनावणी झाली. सुनावणीत अपीलकर्ता मदनकर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ९ऑगस्ट २०११ च्या निर्णयाची माहिती देऊन आपली मागणी रास्त असल्याचे पटवून दिले. ही बाब मान्य झाली. त्यानुसार आयोगाच्या बैठकीत विचार होऊन न्यायालयाच्या निर्णयानुसार उमेदवारांना उपलब्ध असलेल्या स्वत:च्या उत्तरपत्रिकेची प्रत १९ ऑक्टोबर २०११ रोजी मदनकर यांना पाठविण्यात आली व रकमेचा भरणा करुन त्यांची मागणी पूर्ण करण्यात आली.

मदनकर या अभियंत्याने दिलेल्या लढ्याला व केलेल्या संघर्षाला यश मिळून आता राज्यातील उमेदवार आयोगाच्या परीक्षेतील उत्तरपत्रिकेची मागणी करु शकतील. त्यामुळे गुणांच्या मूल्यांकनाविषयी वस्तुस्थिती कळेल आणि आयोगाची पारदर्शकतासुध्दा स्पष्ट होण्यास मदत होईल. आयोगाच्या सर्वच स्पर्धात्मक परीक्षांच्या उत्तरपत्रिका उमेदवारांना प्राप्त करण्यासाठी सुरवात नीलेश मदनकर यांनी करून एक भरीव व महत्वाचे काम संपूर्ण राज्यासाठी केले असल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परिक्षार्थ्यांला उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत दिल्याने आता कोणत्याही परिक्षार्थींना या निकालाचा आधार घेऊन उत्तरपत्रिकेची प्रत मिळविता येईल.हा ऐतिहासिक निकाल आहे.

होईल म्हटले तर, न होणारे काम होऊ शकते. न होईल म्हटले तर, होणारे कामही होणार नाही.

# तक्रार कोठे कराल?

व्यापारातील फसवणूकी संबंधीच्या (अनफेअर ट्रेड प्रॅक्टिस) तक्रारी

कॉन्सिल फॉर फेअर बिझीनेस प्रॅक्टिसेस
ग्रेट वेस्टर्न बिल्डींग,१३०/१३२
ॲपोलो मार्ग, कामा हॉल जवळ
मुंबई-४०० ०२३

स्वयंपाकाच्या गॅससंबंधी तक्रारीसाठी

ऑल इंडिया गॅस युजर्स असोशियेशन
५ बी,अडवाणी चेंबरर्स,
सर फिरोजशहा मेहता मार्ग
मुंबई -४०० ००१

भक्तेदारी व अयोग्य व्यापार (रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस ॲण्ड मोनॉपॉलिस्टिक प्रॅक्टिसेसे)

मोनॉपॉलिज ॲण्ड रिस्ट्रिक्टिव्ह प्रॅक्टिटेस
कमिशन, लावणकोर हाऊस
कस्तुरबा गांधी मार्ग नवी दिल्ली ११० ००१

अन्न पदार्थ, औषधे व प्रसाधनांसंबंधी तक्रारीसाठी लिहा

फुड ॲण्ड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन
गृहनिर्माण भवन, कलानगरसमोर
वांद्रे मुंबई-४०० ०५१

गंभीर कायदेशीर मुद्दे उपस्थित होत असतील अशा महत्वाच्या ग्राहक तक्रारीसाठी

कन्झ्युमर एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च सेंटर
ठाकोरभाई देसाई स्मारक भवन
लॉकॉलेज जवळ, इल्सब्रीज
अहमदाबाद ३८० ००६

कृषी उत्पादने व फळे यांच्यासंबंधीच्या तक्रारीसंबंधी लिहा

डायरेक्टर ऑफ मार्केटिंग ॲण्ड इन्स्पेक्शन
विभागीय कार्यालय,सी.जी.ओ.बिल्डींग
न्यू मरीन लाईन्स
मुंबई- ४०० ०२०

बँकिंग सेवेसंबधीच्या तक्रारीसाठी लिहा

डिपार्टमेंट ऑफ बँकिंग
ऑपरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट
रिझर्व बँक ऑफ इंडिया
द आर्केड,वर्ल्ड ट्रेड सेंटर
कफ परेड, मुंबई-४०० ००५

दुध भेसळीसंबंधीच्या तकारीसाठी लिहा

डेअरी डेव्हलमेंट कमीशनर
जीवन विमा मार्ग, मुंबई -४०० ०२०
डेअरी डेव्हलमेंट कार्पोरेशन
नवीन प्रशासकीय इमारत,
अब्दूल गफारखान मार्ग वरळी -१८

ओळख कायद्याची

# मुंबई वजने व मापे(अंमलबजावणी)अधिनियम १९५८

या कायद्यान्वये केवळ प्रमाणभूत वजने -मापे या व्यक्तीरिक्त इतर वजने व मापे वापरण्यास मनाई आहे.उदा.वजन ग्रॅम व किलो मध्ये तसेच पातळ पदाथ मिलीलिटर व अंतर मिली मिटर-किलो मिटरमध्येच मध्येच मोजता येतील.चिपटे, मापटे,शेर व वार अशी मापे कायदाबाहय मानली जातील.

व्यापार विषयक वजने व मापे यांच्या सज्ञांची निशाणी बनविणे.शिक्का न वठवलेल्या वजने व मापे यांच्या विक्रीस या कायद्यान्वये सक्त मनाई आहे.

शासनाकडून अधिकृत परवाना घेतल्याशिवाय कोणासही वजने -मापे निर्माण करता येणार नाहीत.

सिलबंद पॅक,वेस्टन असणाऱ्या वस्तू, बंद डबे यांच्यावर

वस्तूचे नाव,निव्वळ वजन, अधिकतम किरकोळ किंमत, उत्पादकांचे नाव व पत्ता ,उत्पादनांची तारीख,उत्पादन वापरण्यास उपयुक्त कालावधी,वेष्ठीत वस्तु खाद्यपदार्थ किंवा पेय असल्यास संबंधीत उत्पादकांचा संपर्क क्रमांक

आदी तपशील असला पाहिजे.यातील एकही तपशील कमी असल्यास तो कायद्याचा भंग ठरून उत्पादक,माल कब्जात ठेवणार, विक्रेता यांच्यावर कायदेशीर कारवाई होईल.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक,उपनियंत्रक सहाय्यक नियंत्रक व निरिक्षक असे अधिकारी नियुक्त असतात.प्रत्येक जिल्हास्तरावर उपनियंत्रक दर्जाचे जिल्हा वजने व मापे अधिकारी नियुक्त असतात.तसेच एक किंवा दोन तालुका स्तरावर निरिक्षकांची नियुक्ती होत असते.

निरिक्षकास सिलबंद पॅकेटमध्ये वेष्ठनावरील वर्णनाप्रमाणे वस्तू योग्य मापात व प्रमाणात आहे किंवा नाही हे वेष्ठन फोडून तपासण्याचा अधिकार असतो.

वजने व मापे तयार करणे, दुरूस्त करणे, विक्री करणे आदि बाबतीत योग्य ती पात्रता व फि आकारून परवाना देण्याचा नियंत्रकास अधिकार असतो.

खोटी वजने मापे बनविणे, कब्जात ठेवणे व वजन मापे इत्यादी लबाडीने वापरल्यास कैद व दंडद्रव्य अशी शिक्षेची तरतूद आहे.

करारात वजनाने किंवा मापाने ठरविलेल्या परिणामाहुन कमी किंवा त्यापेक्षा अधिक परिणामात कोणतीही



खोट्या वजन मापांचा वापर, कमी माल देणे, त्याच प्रमाणे आवेष्टित वस्तूंची जास्त दराने विक्री त्यावरील मूळ किंमतीमध्ये खाडाखोड व पाकीटामध्ये कमी माल आढळणे इत्यादीच्या बाबतीमध्ये ग्राहकांची व सर्वसाधारण जनतेची फसवणूक होत असल्याचे आढळून आल्यास व वजन माप विषयक तरतूदीचा भंग होत असल्याचे आढळल्या वजन माप निरिक्षक संबंधीतांवर कारवाई करतो.ग्राहकांस व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास त्यांनी विभाग निरीक्षक जिल्हा सहाय्यक नियंत्रक व उपनियंत्रक व नियंत्रक कार्यालियास तक्रार नोंदवावी.अशी तक्रार प्राप्त होताच संबंधित कार्यालियाकडून त्याची त्वरीत दखल घेतली जाते.तरतूदीचा भंग केल्याबद्दल अपराध्याविरूद्ध खटला नोंदविला येतो.अधिनियमातील तरतूदीनुसार प्रशमन अपराधाचे दंडाची रक्कम शासन जमा करून प्रशमन करण्यात येते.किंवा सदर खटला न्यायालयात दाखल केला जातो.त्याच प्रमाणे याबाबत तक्रारदारास कळविण्यात येते

वस्तू स्वाधीन केल्यास किंवा घेतल्यास त्याबद्दल शास्ती म्हणून दंडद्रव्याची कायद्यात तरतूद आहे.तपासणीसाठी वजन किंवा माप वगैरे हजर करण्यात हायगय केल्यास किंवा वजने मापे तपासणीसाठी हजर करण्याचे नाकारल्यास व्यापाऱ्यास किंवा तोलाऱ्यास दंडदद्रव्याची शिक्षा होईल.

# तक्रार कोठे कराल?

**वजन मापे यांच्या तकारी संबंधी लिहा**

कंट्रोलर ऑफ वेट्स ॲण्ड मेजर्स,
महाराष्ट्र सरकार,
नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग,मुंबई -४०० ०३२

**ॲगमार्क चिन्ह असलेल्या उत्पादनाच्यां बद्दल तकारीसाठी लिहा**

डायरेक्टोरेट ऑफ मार्केटिंग ॲण्ड इन्स्पेक्शन
पश्चिम विभागीय कार्यालय, ३ रा मजला
न्यू सेंट्रल गव्हर्मेंट ऑफिसेस
सर विठ्ठलभाई ठाकरसी मार्ग मुंबई-४०० ०२०

**आय.एस.आय.शिक्काप्राप्त मालासंबंधी तक्रार असेल तर लिहा.**

इडियन्स स्टॅडर्ड इन्स्टिटयूट ऑफिस
इ/ ९,एम.आय.डी.सी. मरोळ
अंधेरी ( पूर्व ) मुंबई -९३

**विजेच्या असुरक्षित उपकरणांबाबत तकार कोठे करावी ?**

सुपरिटेंडेंट इंजिनिअर यांचे कार्यालय
दर्जा नियंत्रण विभाग, आय.ई.एल.विभाग
सरदार पटेल स्टेडियम, प्रशासकीय इमारत
दुसरा मजला वरळी, मुंबई -१८

**दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीसंबंधीच्या तकारीसाठी जरूर लिहा**

ॲडव्हर्टायझिंग
स्टॅडर्डस् कॉन्सिल ऑफ इंडिया
बजाज भवन, २ रा मजला
नरीमन पॉईन्ट मुंबई -२१

**फलोत्पादने प्रक्रिया (जॅम,लोणची सरबते ) इत्यादींच्या दर्जा व तत्सम तकारीसाठी**

फ्रुटस् ॲण्ड व्हेजिटेबल मिनिस्टी ऑफ
फ्रुट प्रोसेसिंग इंडस्ट्री
३१९, जूनी सेंट्रल गव्हर्मेंट बिल्डींग
महर्षी कर्वे मार्ग मुंबई-२०

**पेट्रोलियम पदार्थामधील भेसळ व तकारीसाठी**

इंडियन ऑईल
शिवसागर इस्टेट,ॲनी बेझंट मार्ग
वरळी -८

**सोने हॉलमार्क किंवा सराफाने केलेल्या फसवणूकीच्या तक्रारीसाठी लिहा**

डेप्यूटी कलेक्टर ऑफ कस्टम प्रिव्हेन्शन
(गोल्ड कंट्रोल)
४ था मजला, ट्रान्सपोट हाऊस,पुना मार्ग
मशीद बंदर मुंबई -९

मन हे उधळणा-या घोडयांसारखे आहे त्याला विचाराच्या लगामाने रोखा .

# बेस्ट RTI कार्यकर्ता पुरस्कार -२०१२

आपण माहिती अधिकार कार्यकर्ते आहातच.महाराष्ट्रातील सर्वोत्तम कार्य केलेल्या आघाडीच्या २० कार्यकर्त्यांचा बेस्ट आरटीआय कार्यकर्ता पुरस्कार देवून गौरव केला जाणार आहे.सदर राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम मार्च २०१२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रम स्वराज बहुउद्देशीय संस्था तसेच मुंबई कार्यरत अन्य संस्थांकडून प्रायोजित होणार आहे.महाराष्ट्राच्या सर्वदूर व सर्व विभागात माहिती अधिकार वापरून प्रसंगी प्रस्थापितांच्या धमक्या व मार खाऊन,प्राणांची बाजी लावून उत्तम कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची सार्थ सन्मान होणे ही समाजाची गरज आहे या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी कार्यकर्त्यांनी संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई-९६ सेक्टर -१२ खारघर नवी मुंबई येथे आपण वर्षभर मागीतलेली माहिती,उघड केलेली भ्रष्टाचारांची प्रकरणे, व सलग्न माहिती पाठवावी ही विनंती.

## रेडिमेड प्रश्नावली

**माहिती अधिकारात सर्व सरकारी विभागांना कशी ,काय व कोणती माहिती मागावी ?**

### आपल्या भागातील अनुदानीत क्रीडासंस्थांची माहिती मागा तसेच ग्रामपंचायत व सेतू कार्यालयाची माहिती मागा

.नागरिक अधिकारच्या कार्यालयात मराठवाडयातील एक गावातून फोन आला. एक कार्यकर्ता बोलत होता.साहेब आमच्या गावात कॉमनवेल्थ घोटाळा झालाय.असा त्याचा सुर होता. गावात व्यायामशाळेसाठी एका क्रीडासंस्थेला क्रीडाखात्याकडून दोन लाख रूपयाचे अनुदान मिळाले .हे दोन लाख रूपये मिळूनही ना क्रीडासाहित्य आले ना व्यायामशाळा सुरू झाली.त्यामुळे गावात व्यायाम करण्यासाठी इच्छूक असलेल्या अनेक तरूणांची निराशी झाली.क्रीडासाहित्याच्या नावाखाली क्रीडा अधिकारी व स्थानिक संस्था मिळून असे गावोगावचे अनुदान लाटीत असून खरेच हा राज्यपातळीवरील मिनी कॉमनवेल्थ घोटाळाच आहे.हा गावाचा घोटाळा बाहेर काढण्यासाठी माहिती अधिकार अर्ज कसा टाकावा असा कार्यकत्याचा प्रश्न होता.म्हणून तशी प्रश्नावली दिली आहे.

तसेच अनेक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी सेतू सुविधा केंद्र सुरू आहेत.पुण्यातील एक जेष्ठ नागरिकाने प्रत्येक सरकारी परवान्यासाठी १८ ते २० रूपये सेवाशुल्क आकारण्यावर आक्षेप घेतला.रोज हजारो परवान्यासाठी अर्ज येतात.सेतूच्या हेतू बद्दल शका यावी असे सेवाशुल्क का आकारले जाते याचा शोध घेण्यासाठी माहिती अधिकाराचा वापर कसा करता येईल हा जेष्ठ नागरिकांचा प्रश्न होता.म्हणून तशी प्रश्नावली दिली आहे.ग्रामपंचायतीच्या विकासकामाची व व्यवहाराची माहिती मागविण्यासाठी नमुना प्रश्नावली द्यावी अशी मागणी आली होती.या सर्व प्रश्नावलीचा आधार घेऊन त्यात आपल्या सोयीनुसार बदल करून कार्यकर्त्यानी याचा माहिती अधिकारासाठी वापर करावा.(नमुना अर्ज पान न.१३,१४ व १५ वर आहेत)

.सामाजिक कार्यकर्त,आरटीआय कार्यकर्त्यांनी आपले माहिती अधिकार वापरताना आलेले अनुभव,आपल्या सक्सेस स्टोरीज् तसेच त्यांनी वापरलेले प्रभावी अर्जाचे नमूने, माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय, अशा प्रकारातील लेख व अनुभव लिहून **नागरिक अधिकार** कडे पाठवावेत योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. मासिक नागरिक अधिकार हे माहिती अधिकारांचा वापर करून प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपले हक्कांचे व्यासपीठ असणार आहे.आपल्या हक्काचे हे व्यासपीठ बळकट करण्यासाठी आपण नक्की सहकार्य कराल हा विस्वास आहे.

ज्याच्याकडे सहनशीलता आहे तो कधीच पराभूत होत नाही .

# आपल्या गाव व परिसरातील क्रीडासंस्थाच्या अनुदानाची तपासणी करा.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

जिल्हा क्रीडा अधिकारी

-----------------जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय

१) अर्जदाराचे नांव - ---------------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :-------------------------------------------------

३) माहितीचा विषय - ------------ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या माध्यमातून -------- जिल्हामध्ये क्रीडासंस्थांना विविध उद्देशासाठी मिळालेल्या अनुदानाचा व मदतनिधीचा तपशील अन्य माहिती.

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी खालीलप्रमाणे (२००९ ते २०११)

अ) ----------जिल्हात २००९ पासून ते २०११ पर्यंत कोणकोणत्या क्रीडासंस्थाना व्यायामशाळा साहित्यासाठी किवा अशा उद्देशाच्या हेतून किती अनुदान किंवा मदत निधी वितरीत करण्यात आला.याचा तपशील द्यावा

ब) आपल्या जिल्हयातील आपल्या कार्यालयाकडून मदत किंवा अनुदान मिळालेल्या सर्व क्रीडासंस्थांचे नावे व पत्ते व कोणत्या उद्देशासाठी किती अनुदान किंवा मदत मिळाला याचा प्रत्येक वर्षाचा व प्रत्येक संस्थचा तपशील द्यावा.

जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या क्रीडा विकासासाठी आपल्या कार्यालयाच्या वतीने कोणकोणत्या योजना, क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा विषयक उपक्रम दरवर्षी राबवले जातात. अशा सर्व उपक्रमाचा तपशील द्यावा.

क) क्रीडा विषयक अनुदान किंवा मदत घेतलेल्या संस्थांना आपण दिलेले अनुदान सदर संस्थानी ठरलेल्या उद्देशासाठीच वापरले आहे काय ? याची तपासणी कोणते अधिकारी करतात त्यांचा नाव व हुद्दा द्यावा.सन २००९ पासून किती संस्थांची तपासणी करण्यात आली.२००९-२०११ या वर्षात तपासणी केलेल्या संस्थाचे पाहणी रिपोर्ट / निरिक्षण अहवाल याच्या सत्यप्रती द्याव्यात.

ड) आपल्या कार्यालयाकडून मिळालेल्या अनुदान उचित उद्देशशावर खर्च न केल्याने झालेल्या गैरव्यवहराची किती प्रकरणे सद्या पहाणीमधून उघड झाली आहेत.अशा तपासणी चालू असलेल्या किंवा कायदेशीर कारवाई केलेल्या प्रकरणाची माहिती द्यावी

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती स्पीड पोस्टाने पाठवावीं. / व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------

दिनांक : --------------------

अर्जदाराची सही

(नाव ----------------)

**Mo: 000000000**

मोहाचा पहिला क्षण, ही पापाची पहिली पायरी असते.

# ग्रामपंचायत विकासकामाची तपासणी करण्यासाठी अर्जाचा नमूना

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

द्वारा ग्रामसेवक

-------------------- ग्रामपंचायत कार्यालय

ता.----------- जि-------------------

१) अर्जदाराचे नांव - -----------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :----------------------------------------------

३) माहितीचा विषय - ------------------- या ग्रामपंचायती संदर्भातील माहिती मिळणेबाबत

अ) ग्रामपंचायतीने सन २००९ ते २०११ दरम्यान कोणकोणती विकास कामे केली ? विकास कामाची यादी द्यावी. या विकास कामासाठी केंद्र सरकार, राज्य सरकारच्या कोणत्या योजनेतून किती निधी मिळाला. सदर निधी कधी व कसा खर्च करण्यात आला.

ब) आपल्या ग्रामपंचायतीच्या मागील तीन वर्षाच्या ऑडिट रिपोर्टची छांयाकित प्रत द्यावी.

क) ग्रामपंचायतीमध्ये एकूण किती कर्मचारी आहेत. त्यांना किती रूपये मासिक वेतन दिले जाते याचा तपशील द्यावा.

ड) ग्रामपंचायतीला २००९ ते २०११ या तीन वर्षात प्रतिवर्षी कोणकोणत्या उद्देशासाठी शासनाकडून किती रूपये थेट अनुदान किंवा मदत रक्कम मिळाली ? या रक्कमेचा विनीयोग कोठे केव्हा व कसा झाला.

इ ) २००९ पासून २०११ आज तारखेपर्यंत ग्रामपंचायतीच्या एकूण किती ग्रामसभा भरवल्या गेल्या. प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित पुरूष व महिला सदस्यांची नावे व पत्ते मिळावेत. ग्रामसभेत मंजूर झालेल्या सर्व ठरावांची छायांकित प्रती मिळाव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी / व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : ------------------

दिनांक : ---------------------

(नाव -----------------)

**Mo: 000000000**

# तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयतील सेतू सुविधांची तपासणी

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

----------तहसील कार्यालय / -----------जिल्हाधिकारी कार्यालय

ता. ----------------- जि. ----------

३)माहितीचा विषय - -------तहसील कार्यालयातील सेतू सुविधा सेंटर विषयी माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी

अ) --------तहसील मध्ये सेतू सुविधा केंद्र केव्हा सुरू झाले ? हे सेतू कार्यालय चालवण्याचा ठेका (कंत्राट आणि जबाबदारी) कोण संभाळतो ? त्याचे नाव व पत्ता द्यावा.ठेका किंवा कंत्राटाच्या अटी व शर्थीची एक सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी

ब) सेतू सुविधेपासून सन २००९ या वर्षात आणि २०११ च्या पर्यंत किती उत्पन्न मिळाले ? दरमहाचा तपशील द्यावा . या मिळालेल्या उत्पन्नाचा ठेकेदारास व तहसील कार्यालयास मिळालेला हिस्सा किती ? तपशील द्यावा.

क) सेतू सुविधा केंद्रात सद्या किती कर्मचारी काम करतात ? त्याची नावे व पत्ता द्यावा.तसेच त्यांना दरमहा एकत्रीत किती वेतन मिळते ?प्रत्येकाचा तपशील द्यावा. हे कर्मचारी कायम स्वरूपी नियुक्त आहेत की कंत्राटी पद्धतीने नियुक्त आहेत ? कंत्राटी पद्धतीने कार्य करीत असतील तर त्यांची नोंद जिल्हा / विभाग कामगार आयुक्त यांच्याकडे केली आहे काय ? केली नसल्यास का केली नाही ?या कामगारांना दाखले परवाने बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले आहे काय ?

ड) सेतू सुविधा केंद्रातून दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध सेवांसाठी किती रक्कम आकारली जाते ? ही रक्कम कोणत्या आधारे ठरवली गेली ? याचा तपशील द्यावा.अशी रक्कम ठरविण्यापूर्वी तहसील कार्यक्षेत्रातील नागरिकांना सूचीत करण्यात आले होत काय ?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------

दिनांक : ---------------------

अर्जदाराची सही

(नाव -----------------)

Mo: 0000000000

शेवटचे पान ..

# प्रेरणा



जीवनाला ऊर्जा देणार इंधन !

## स्वराज विचारधारा...

आम्ही समाजसेवा करायची तरी कशी व कोठून सुरूवात करायची असा प्रश्न अनेकाना पडतो.याचे उत्तर गांधीचे जीवन पाहिले की सहज मिळते.म.गांधीनी माझे जीवन हाच माझा संदेश आहे असे म्हटले होते. समाज सेवा सुरू करताना स्वत:पासून सुरूवात हे सूत्र अंमलात आणा.त्यातून मोठा बदल होईल.पर्यावरणाच्या ऱ्हासाविरोधात लढायच आहे तर पहिल्यांदा स्वत: निसर्गपूरक वागायला सुरूवात करा.भ्रष्टाचाराविरोधात लढायच आहे तर प्रथम स्वत: भ्रष्ट आचारापासून दूर रहा़ अन्यथा असे सामाजिक उत्तरदायित्व निभावून नेण्याचा अधिकार तुम्हाला प्राप्त होत नाही.कारण तुमच्या बोलण्यावररून नव्हे तर तुमच्या वर्तनावरून समाज तुमचे मूल्यमापन करीत असतो. तेव्हा सुरूवात स्वत:पासून हे कधीच विसरू नका.

आता समाजसेवेसाधे पैसा व साधने आणयची कोठून हा प्रश्न पडलाचा तर जे उपलब्ध आहे त्यातून सुरूवात करा.आपल्या कडे पैसा नाही, धन नाही, कार्यालय नाही अशी कुरकुर करूच नका. आपल्याकडे जबरदस्त इच्छा शक्ती आहे.चार दोन जीवाभावाचे मित्र व सहकारी आहेत.मनात समाजिक निर्माणाची मजबूत संकल्पना आहे तर मग पैसा, धन व जागेवाचून काही अडत नाही. सारे सभोवताल माझे आहे असं वाटणारं विपूल मन जर तुमच्या जवळ असेल तर मग समाजसेवा तुमच्याकडून आपोआप होत राहिल.

प्रति,

BOOK-POST

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९९२३४५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
MAHMAR39311/13/1/2011TC